# जयहिंदमध्ये बसचालकांची आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कुरण व प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी, चिंचवड यांचे संयुक्त विद्यमाने जुन्नर तालुक्यातील सर्वच शैक्षणिक संस्थांमधील शालेय बसचालकांकरिता मोफत नेत्र व आरोग्य तपासणीचे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी ज्या शालेय बस ड्रायव्हर यांना डोळ्याचा नंबर आहे , अशा शालेय ड्रायव्हर यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले व ज्यांना आरोग्य विषयी काही तक्रारी आहे यांना मोफत औषधे वाटप करण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड येथील सहायक परिवहन अधिकारी पवन नव्हाडे, मोटार वाहन निरीक्षक अनिल वैरागडे, अंजली पाथरे, चैतन्य गमे, प्रियांका जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी जयहिंद संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, डॉ. डी.एस. गल्हे, जयहिंद इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. डी. जे. गरकळ, जयहिंद औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुभाष आंद्रे, प्रा. वाल्मीक घोलप, प्रा. किरण फड उपस्थित होते.



जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कुरण येथे बसचालकांकरिता आयोजित मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ.